# कोल्हापूर महानगरपालिका
# जाहीर नोटीस

ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने दि. ०३/१०/२००८ रोजीच्या शासकीय राजपत्राच्या भाग ८ (इंग्रजी) मध्ये प्रसिध्द केले प्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सदर कायदा) सुधारणा करुन महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीत उपयोग, उपभोग किंवा विक्री या उदेशांसाठी (विहीत उद्दीष्टे ) प्रवेश करणाऱ्या मालावर शासनाच्या पुर्वसम्मतीने मालाच्या प्रवेशा वरील उपकर (उपकर) लावणेचा अधिकार प्रदान केला आणि ज्या अर्थी कोल्हापूर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र..२०४ दि. ३१/१०/२००८ ने शासनाच्या पुर्वानुमतीने सदर उपकर आकारणेस मान्यता दिली आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने राजपत्र अधिसूचना भाग ४-ब, नगरविकास विभाग दि.२१ ऑक्टोबर २००८ ने या महानगरपालिकेस आपल्या हद्दीत (विहीत उद्दीष्ठासाठी) प्रवेश करणाऱ्या मालावर, मालाच्या प्रवेशावरील उपकर आकारणेस परवानगी दिलेली आहे, आणि

ज्या अर्थी कोल्हापूर महानगरपालिकेने मुख्य कायद्याच्या कलम १४९ उपकलम (३) मधील तरतुदींच्या अनुपालनार्थ आपल्या हद्दीत ठरलेल्या दिनांकास व त्या नंतर विहीत उद्देशासाठी प्रवेश करणाऱ्या मालावर उपकर लागू करणेसाठी १ नोव्हेंबर २००८ निश्चित केला,

त्या अर्थी संबधीत व्यापाऱ्याच्या माहितीसाठी आता असे जाहीर करणेत येते की,

(अ) सदर कायद्यातील कलम १५२ अ च्या उपकलम (२) मधील तरतुदीन्वये महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराने उपकराचा भरणा करण्याचे कायदेशीर बंधन व्यापाऱ्यांच्यावर टाकण्यात आलेले आहे.

ब) व्यापारी व आयातदार या संज्ञाची व्याख्या :

सदर कायद्यातील कलम २ मधील अनूक्रमे खंड (१६अ) व (२८अ) अन्वये व्यापारी व आयातदार यास संज्ञाची व्याख्या खालील प्रमाणे करणेत येत आहे.

१) **व्यापारी -** (१६अ) व्यापारी म्हणजे स्वतःच्या धंद्याच्या प्रयोजना करीता किंवा स्वतःच्या धंद्याच्या संबधात किंवा त्या अनुषंगाने शासन कोणत्याही मालाची कमिशन पारीश्रमिक यावर किंवा अन्यथा आयात खरेदी किवा विक्री करते अशी कोणतीही व्यक्ती आणि त्या पुढील व्यक्तीचा समावेश होतो.

अ) तो शहरामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्याच्या मग त्यांची माहिती उघड केलेली असो किंवा नसो, मालकीच्या कोणत्याही मालाची खरेदी करतो विक्री करतो त्या पुरवठा करतो त्याचे वितरण करतो किंवा त्याची आयात करतो असा कोणत्याही नांवाने संबोधला जाणारा आणि यात पुर्वी

विनिर्दिष्ट केलेल्या अशा त्याच वर्णनाचा असणारा किंवा नसणारा असा आडत्या, दलाल, कमिशन एजंट अश्वासक अभिकर्ता किंवा अन्य कोणत्याही वाणिज्य अभिकर्ता

ब) जो शहरामध्ये कोणतीही प्रकर्त्याच्या मग त्याची उघड केलेली असो अगर नसो मालकीच्या मालाची विक्री करतो किंवा लिलाव करतो तो लिलावकार मग इच्छुक खरेदीदाराचा देकार त्याने किंवा प्रकर्त्याने किंवा प्रकर्त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने स्विकारलेला असो किवा नसो

क) कमिशनवर परिश्रमीकावर किंवा अन्यथः प्रत्यक्षपणे व अन्यथा मालाची खरेदी विक्री पुरवठा वितरण किंवा आयात (मग ते धंदाच्या ओघात असो वा नसो) करणारे केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन,

ड) आपल्या सदस्यां करीता किंवा त्यांच्या वतीने रोख रक्कमेवर किंवा स्थगीत प्रदानावर किंवा कमिशनवर परिश्रमीकावर किंवा अन्यथा मालाची आयात, खरेदी विक्री पुरवठा किंवा वितरण मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो. करणारी संस्था क्लब किंवा व्यक्तींना अन्य संघ (मग ते विधिव्दारा संस्थापीत असो वा नसो)

स्पष्टीकरण :- या खंडाच्या प्रयोजनार्थ (अ) अनिवासी व्यापाऱ्यांच्या शहरामध्ये राहणारा जो व्यावस्थापक किंवा अभिकर्ता शहरामध्ये मालाची आयात खरेदी विक्री पुरवठा किंवा वितरण करतो अथवा अशा व्यापाऱ्यांच्या वतीने -

अ) माल विक्री अधिनियम १९३० मध्ये केलेल्या व्याख्ये प्रमाणे असलेला वाणिज्य अभिकर्ता म्हणून

ब) मालाची किंवा मालाच्या संबधातील हक्कविषयक दस्तऐवजांची हाताळणी करणारा अभिकर्ता

म्हणून किंवा

क) मालाच्या विक्रीची किंमत वसुल करणेसाठी वा देण्यासाठी किंवा अशा वसुलीची वा प्रदानाची हमी देण्यासाठी अभिकर्ता म्हणून काम करतो तो व्यापारी किंवा अशा वसुलीसाठी वा देण्यासाठी हमीदार असण्याचे मानण्यात येईल.

**ब) खंड** (५अ) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदी मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पुढील पैकी जी व्यक्ती व संस्था मालाची त्यामध्ये बेवार्शी असलेल्या किंवा सरकार जमा केलेल्या किंवा निकामी झालेल्या किंवा भंगार जादा जूने अप्रचिलीत असलेले किंवा काढून टाकलेले सामान किंवा टाकावू उत्पादन म्हणून असलेल्या मालाच समावेश आहे. लिलावाव्दारे या अन्यथा प्रत्यक्षपणे अभिकर्त्या मार्फत रोख रक्कमेवर किंवा स्थगीत प्रदानावर किंवा अन्य कोणत्याही मौल्यवान मोबदला घेवून विल्हेवाट लावतो ती प्रत्येक व्यक्ती व संस्था व्यापारी असलेचे मानणेत येईल.

अ) बंदर विश्वस्त मंडळे

ब) महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा आणि इतर स्थानीक प्राधिकरणे

क) भारतीय रेल्वे अधिनियम १८९० अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे रेल्वे १८९० प्रशासन

ड) जहाज वाहतूक परीवहन व बांधकाम कंपन्या

इ) विमान परिवहन कंपन्या व विमान वाहतूक कंपन्या

फ) मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये देण्यात आलेले भाड्याने व मोबदल्या दाखल वापरल्या जाणाऱ्या किंवा वापर करण्यासाठी जूळत्या करुन घेतलेल्या परीवहन वाहनांना परवाना धारण करणाऱ्या वाहतूक करणाऱ्या व्यक्ती

प) मार्ग परिहवन महामंडळ अधिनियम १९५० अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ

ट) सिमाशुल्क अधिनियम १९६२ ची अम्मलबजावणी करणारा भारत सरकारचा सिमाशुल्क विभाग

आय) विमा व वित्तीय महामंडळे किंवा कंपन्या आणि बँक व्यवसायी कंपन्या

च) जाहिरात कंपन्या

के) केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्यांनी स्थापन केलेले अथवा त्यांच्या प्रशासकीय निवारणाखाली असलेल्या कोणतेही महामंडळ कंपनी संस्था किंवा प्राधिकरण

**अपवाद :** (एक) केवळ स्वतःच्या उपयोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती

आणि धंद्यामध्ये व पतसंस्था राज्य किंवा केंद्र शासनाचा विभाग हे व्यापारी असणार नाहीत.

(दोन) जो शेतकरी केवळ त्याने स्वतः कसलेल्या जमिनीत काढलेले कृषी उत्पादन विकतो तो

शेतकरी या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानण्यात येणार नाही.

२) **आयातदार :** (२८अ) आयात करणारा म्हणजे जी व्यक्ती शहरामध्ये उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी शहराच्या क्षेत्राबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून शहराच्या हद्दीमध्ये कोणताही माल आणते किंवा आणण्याची व्यवस्था करते ती व्यक्ती.

३) **(क) नोंदणी बंधनकारक :-** सदर कायद्यातील कलम १५२ फ च्या उपकलम (१) मधील तरतुदी अन्वये उपकर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यापाऱ्यांने सदर कायद्याखाली नोंदणीकृत होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

**ड) नोंदणीकृत न झालेस होणारे दंडात्मक परिणाम :-**

उपकर भरण्यास पात्र असलेल्या व्यापाऱ्यांनी सुधारीत कायद्यातील कलम १५२ फ अन्वये आवश्यक असल्या प्रमाणे सदर कायद्याखाली वर उल्लेख केल्या प्रमाणे नोंदणी करुन न घेतलेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका (मालाच्या प्रवेशावरील उपकर) नियम १९९५ (उपकर नियम) मधील नियम ४३ मधिल उपनियम (२) मधील खंड (अ) मधील तरतुदीन्वये.

सदर कायद्यातील संबधीत तरतुदींचा भंग करुन व्यापारी म्हणून धंदा केलेल्या कालावधीत देय असलेल्या उपकराच्या दहापटीपेक्षा जास्त नसेल इतक्या दंडाची आकारणी करता येते.

ई) सदर कायद्यातील कलम १५२ ब मधील तरतुदीन्वये ज्या व्यापाऱ्याची

१) मागील म्हणजे २००७-०८ या वित्तीय वर्षातील

२) चालू म्हणजे २००८-०९ या वित्तीय वर्षातील

३) पुढील कोणत्याही वित्तीय वर्षातील सर्व विक्रीची किंवा खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल उपकर नियमात विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होत असले असा प्रत्येक व्यापारी उपकर भरण्यास पात्र असेल.

फ) **उलाढालीची मर्यादा :-** उपकर नियमातील नियम ३ अन्वये उपकराच्या दायित्वासाठी उलाढालीची मर्यादा खालील प्रमाणे आहे.

(३अ) जो आयातक आहे व ज्यांनी अनुसुची अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुंच्या विक्रीची किंवा खरेदीची उलाढाल वर्षभरात रु. ५०००/- पेक्षा कमी नाही आणि वर्षभरात त्याने आयात केलेल्या वस्तुंच्या विक्रीची किंवा खरेदीची उलाढाल वर्षभरात विक्रीच्या उलाढालीची किंवा खरेदीच्या उलाढालीची मर्यादा रु. ७५०००/- असेल.

(ब) खंड (अ) अन्वये एखादा व्यापारी उपकर भरणेस पात्र झालेला नसेल अशा प्रकरणासह इतर कोणत्याही प्रकरणात आणि अनुसूची ब मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या वस्तुंच्या खरेदीची उलाढाल रु. ५०००/- पेक्षा कमी नसेल त्या बाबतीत विक्रीच्या उलाढालीची किंवा खरेदीच्या उलाढालीची मर्यादा रु. १,२५,०००/- असेल.

**नोंदणी करावयाच्या अर्जाची काल मर्यादा :-**

उपकर नियमातील नियम १३ मधील उपनियम (१) मधील मधील तरतुन्वये नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असलेल्या प्रत्येक व्यापाऱ्याने या नियमातील उपनियम (२) मधील तरतुदीन्वये खाली दर्शविलेल्या कालावधीत नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मागील म्हणजेच २००७-०८ वित्तीय वर्षातील | सर्व विक्रीची किंवा खरेदीची उलाढाल निश्चित दिनांकापूर्वी उपकर नियमातील नियम ३ मध्ये विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होत असलेस | निश्चित दिनांका पासून २० दिवसात |
| १अ | चालू म्हणजेच २००८-०९ वित्तीय वर्षातील | | |
| २ | चालू म्हणजेच २००८-०९ वित्तीय वर्षातील | सर्व विक्रीची किंवा खरेदीची उलाढाल निश्चित दिनांकानंतर उपकर नियमातील नियम ३ मध्ये विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होत असलेस | ज्या दिवशी अशी विहीत मर्यादा ओलांडली असेल त्या दिवसापासून तीस दिवसात |
| ३ | २००८-०९ नंतरच्या अन्य कोणत्याही वित्तीय वर्षातील | सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची उलाढाल उपकर नियमातील नियम ३ मध्ये विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होत असल्यास | ज्या दिवशी अशी विहीत मर्यादा ओलांडली असेल त्या दिवसापासून तीस दिवसात |

वर उल्लेख केलेप्रमाणे सुधारीत कायद्याखाली नोंदणी पात्र असणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांनी महागरपालिकेच्या संबधीत प्रभागातील नोंदणी अधिकाऱ्याकडे उपकर नियमातील नमुना अ मध्ये विहीत मुदतीत अर्ज सादर करुन नियमातील दंड नियम कार्यवाही टाळावी.

नमुना अ मधील कोरे नमुने खालील ठिकाणी उपलब्ध असतील -

१. **उपकर विभाग,**
शिवाजी मार्केट, दुसरा मजला,
शिवाजी चौक, कोल्हापूर - ४१६ ००२

( विजय सिंघल )
आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका